# पुणे मर्डर क्रॉनिकल्स

**मानसी सप्रे**

अनुवाद

**विलास फडके**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Pune Murder Chronicles by Manasi Sapre
Marathi translation by Vilas Phadke
First published in English by Rumour Books India in 2015
Copyright © Manasi Sapre 2015
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Rumour Books India.

**पुणे मर्डर क्रॉनिकल्स** : मानसी सप्रे

अनुवाद : विलास फडके

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**

विलास फडके
ए/३०६, व्हिजन सिटी, जांभूळगांव,
पो. कन्हे, ता. मवाळ, पुणे-४१२१०६
मो. नं. : ९४२११७०११५

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ ३७०/-

# पुणे मर्डर क्रॉनिकल्स

## *लेखिकेचे मनोगत*

गुन्हेगारीच्या चष्म्यातून समाजातील नैतिकता आणि गुंतागुंतीकडे बघणारे महान लेखक व चित्रपट निर्माते यांच्यावर साहित्याचा जबरदस्त प्रभाव आहे. हिचकॉक, हेनिंग मॅन्केल, नात्सुओ किरिनो, ताना फ्रेंच, अर्थर कॉनन डायल, डोस्टोव्हस्की यांच्यासारख्या अनेक महान साहित्यिकांनी गुन्हेगारी व गुन्ह्यांचे बळी या विषयावर भरीव कामगिरी केली आहे.

ही कादंबरी लिहिण्यासाठी मदत करणाऱ्या सर्वांनाच माझे मन:पूर्वक धन्यवाद! पत्रकारिता आणि पुण्यातील बदलांची प्रेरणा असणारे साप्ताहिक सकाळचे भूतपूर्व संपादक सदा डुंबरे, नागरी गुन्हेगारी, विधी व पोलीस कार्यपद्धती यासंबंधी सखोल माहिती देणारे, द. मुंबई गुन्हेगारी शाखेचे प्रमुख सहा. पोलीस आयुक्त यशवंत व्हटकर, दैनिक वृत्तपत्रांच्या कार्यपद्धतीबद्दल माहिती देणारे तरुण भारत व लोकमतचे माजी संपादक दशरथ पारेकर, सतत पाठीशी उभे असणारे झरिना मेहता व रोनी स्क्रूवाला .... पर्पल फोलिओच्या ऊर्मिला दासगुप्ता, शिक्रित सेराई, राधिका पणिकर आणि हे पुस्तक छापणारे रूमर बुक्सचे राहुल पुरी.

आयुष्यभर वाङ्मय व ध्येयवादावर प्रेम करणारे माझे आईवडील प्रतिमा-अविनाश आणि भाऊ निहार. आपली शेपूट हलवीत मला विश्रांती घेण्याची जाणीव करून देणारा मिश्किन आणि अखेरीस सतत माझ्या पाठीशी उभा असणारा, माझे मूड सांभाळणारा आणि रात्री जागरण सहन करणारा रोमोजॉय!

✦✦✦

## प्रस्तावना

गाजलेल्या काल्पनिक कथा-कादंबऱ्यांमध्ये नेहमीच समाजातील न्याय, नैतिकता, भेदभाव इ. गोष्टींचे प्रतिबिंब दाखविण्यासाठी गुन्हेगारीचा आरशासारखा वापर केला जातो. डोस्टोव्हस्कीपासून स्टीग कर्सनपर्यंत सारेच लेख गुन्हेगारी, सांस्कृतिक बदल व सामाजिक जबाबदारीविषयी अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित करतात.

१९९० मधील मुक्त आर्थिक व्यवस्थेपूर्वी भारतात अनेक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदल होत होते. या बदलांमुळे पारंपरिक नैतिक बंधनांविषयी अनेक प्रश्न उपस्थित होत होते आणि त्यातून अधिक गुंतागुंतीचे नवीन प्रश्न निर्माण होत होते.

भरभराटीस येत असलेल्या आधुनिक शहरात नेहमीच विरोधाभास दिसून येत होता. आम्हाला गलेलठ्ठ पगार तर हवे होते पण आमचे जुनाट बुरसटलेले विचार सोडायला मात्र आमची तयारी नव्हती; मोठ्या कार्स, मोठे कार्पोरेट पार्क्स, मोठे मॉल्स हवे होते पण नगरनियोजनाचा साधा विचार करण्याचीही आमची तयारी नव्हती. आम्हाला आमचे हक्क हवे होते पण शेजारच्या अल्पसंख्य व दरिद्री लोकांचा विचार करण्याची आमची तयारी नव्हती. स्वत:ची जुनाट निरर्थक मूल्य कवटाळून बसणाऱ्या शहरांपैकी पुणे एक होतं. या कादंबरीत पुणे शहरच दुतोंडी समाजाची महत्त्वाची भूमिका बजावतं.

आम्हाला २१ व्या शतकातील महासत्ता बनायचं आहे पण आम्ही मागील शतकातील भेदभाव नीतीला कवटाळून बसतो. आमच्या समाजात असणारं स्त्रियांचं स्थानच या गोष्टीचं प्रतीक आहे. आधुनिक शहरात आमचा समाज स्त्रियांसंबंधी विविध प्रश्नात विभागला गेला आहे. त्यांनी कपडे कसे घालावेत, लग्न कुणाशी करावं, लैंगिक संबंध कुणाशी अथवा कसे ठेवावेत, त्यांनी पैसा

कसा मिळवावा, काय शिकावं, मुलं कशी वाढवावीत, कुठे फिरावं अशा प्रकारचे सतराशे साठ प्रश्न आधुनिक स्त्रियांविषयी समाजाची मनोभूमिका स्पष्ट करतात. गेल्या काही वर्षांत आधुनिक भारतातील लैंगिक प्रश्नांवर प्रसारमाध्यमांतून बरीच चर्चा होते. या कादंबरीमुळे मध्यमवर्गीय परिवार व कार्यालयात उद्‌भवणाऱ्या लैंगिक प्रश्नांवर चर्चा होईल अशी धारणा आहे.

काहीजण गुन्हेगारी स्वरूपाच्या कथा-कादंबऱ्यांचे वेडे असतील. मला मात्र माझ्या नैतिकतेविषयी कल्पना मनोरंजक पद्धतीने मांडण्यासाठी कादंबरी हेच माध्यम योग्य असल्याचे वाटत आले. ही कादंबरी लिहिताना मला जेवढा आनंद झाला तेवढाच तुम्हाला ती वाचतानाही होईल अशी आशा आहे.

**– मानसी सप्रे**

✦✦✦

## *१ जानेवारी*

पुणे, नवीन वर्षाचा पहिला दिवस, हवेत कमालीचा गारठा.

कुमारनं अश्रुभरल्या डोळ्यांनी अंगातील डिझायनर लिनन शर्टवर आपल्याच ओठातून पडणाऱ्या रक्ताच्या थेंबांवर नजर टाकली. टप-टप-टप! आता थेंबांचा वेग कमी झाला होता पण शर्टावर काळसर लाल रंगाचे शिंतोडे उडत होतेच. सांडलेल्या रक्ताचा हलकासा ओघळ होऊन तो पोटाच्या दिशेनं खाली सरकत होता. तोच ओघळ खाली सरकत आपल्या इंद्रियापर्यंत गेल्याचंही त्याला जाणवलं. आता त्याच ओल्या पँटमध्ये रक्त मिसळलं जात होतं.

सुदैवानं त्याच्या उंची काळ्या जीन्सवरील रक्त व लघवीचे डाग चटकन लक्षात येत नव्हते. त्याच्याजवळ अशा अर्धा डझन जीन्स होत्या आणि आता त्याच्या अंगावर असलेली त्यापैकी सर्वांत चांगली होती. तिच्यात त्याचा पार्श्वभाग आटोपशीर दिसत होता आणि ती अगदी उत्तम प्रकारे फिट बसत होती. आता मात्र त्याच्या थरथरत्या पायांवर ती सुरकुतलेल्या अवस्थेत लोंबकळत होती आणि तिला घाणही मारत होती.

हात मागे बांधलेले व तोंडावरही पट्टी अशा अवस्थेत कुमार हुंदके देत बसला होता.

त्याचं आपल्या डिझायनर लिनन शर्टवर विलक्षण प्रेम होतं. तो अंगात घातल्यावर एखाद्या सुंदर तरुणीनं आपला मुलायम हात अंगावरून फिरवल्यासारखं वाटे. तो मोहित बाळकडे आलेल्या नवीन मालापैकी होता. शाहरूख खाननं त्याच्यासाठी मॉडेलिंग केलं होतं. फर्ग्युसन कॉलेज रोडवरील एका मोठ्या होर्डिंगवर त्याचं त्याच शर्टमधील चित्र होतं. शाहरूख खान खाली वाकून आपल्याकडे बघणाऱ्या व जवळ पैसे बाळगणाऱ्या प्रत्येकाला तो शर्ट घेण्याचं नजरेनंच आवाहन करीत होता. रुबाबदार-सुंदर-उंची!

आता मात्र तो रक्ताळला होता. भीतीनं घामेजून अंगाला चिकटत होता.

कुमारनं मान वर करून ड्रायव्हरकडे नजर टाकली. तो त्याच्याकडे ढुंकूनही न बघता शांतपणे ड्रायव्हिंग करत होता. कुमारचे हात बांधलेले होते. तोंडात त्याचाच इटालियन सिल्क रुमाल कोंबला होता. तो त्यानं गेल्याच ट्रिपमध्ये दुबईवरून आणला होता. आता त्याला जबरदस्तीनं काळ्या रंगाच्या पजेरोमध्ये कोंबण्यात आलं होतं. ही गाडी आतमधून उत्तम दर्जाच्या अस्सल लेदरनं मढवली होती, हे कुमारच्या जाणकार नजरेनं ओळखलं. 'मलाही खरं तर हीच गाडी घ्यायची होती पण टोयोटा घ्यावी लागली' कुमार मनात येणाऱ्या विचारांना रोखू शकला नाही. पुढच्याच क्षणी त्याला आपल्या या विचाराचं आश्चर्यही वाटलं. 'आयुष्यातील सर्वांत कठीण प्रसंगातून मी आता जात आहे, अशा परिस्थितीत असे विचार मनात येतातच कसे?' त्यानं मनातल्या मनात स्वत:च्या दोन थोबाडीत मारल्या. हात मोकळे असते तर आपण यापेक्षाही जास्त जोरात थोबाडून घेतलं असतं याविषयी त्याला खात्री होती.

'स्वत:ला सावर-विचार कर-पळ-ओरड' मनात एकामागून एक विचार येत होते.

आपण मागल्या सीटवर पसरलेल्या एका प्लॅस्टिक शीटवर बसलो आहोत हे त्याच्या लक्षात आलं. इतका वेळ त्याचं कारण त्याच्या लक्षातच आलं नव्हतं. आता मात्र आपली लघवी-रक्त यांमुळे ते उंची लेदर डागाळणार नाही याचं त्याला हायसंच वाटलं. ड्रायव्हरचा मूड घालवावा असं त्याला वाटत नव्हतं.

गाडी वळून एका चिंचोळ्या जागेत शिरली. ड्रायव्हरनं आरामात ती चिंचेच्या एका मोठ्या झाडाखाली उभी केली आणि कुमारकडं बघितलं. त्याच्या नजरेत आश्चर्य होतं आणि हास्यही होतं. सर्वत्र भीषण शांतता होती.

त्याचं हास्य काहीसं भीतीदायक होतंच पण त्यात वेडसरपणाची झाकही दिसत होती. कसला तरी निश्चय होता.

कुमारनं एकदाच त्याच्याकडे बघितलं. त्या नजरेत हास्य असलं तरी त्याचे डोळे कठोर आहेत, त्यात ओतप्रोत तिरस्कारही भरला आहे हे त्याच्या लक्षात आलं. जिवाच्या भीतीनं त्याला रडूच कोसळलं.

ड्रायव्हर बाहेर आला. त्यानं दरवाजा उघडून कुमारला बाहेर खेचलं. आपले पायही दोरानं बांधले आहेत हे कुमारच्या लक्षात आलं. तो धडपडून खालीच पडणार होता पण त्यानं कसंबसं स्वत:ला सावरलं. ड्रायव्हरचा मूड खराब करण्याची त्याची इच्छा नव्हती. आपण कुठे आहोत? सगळीकडे झाडंच झाडं